**<u>फौजदारी प्रक्रिया संहित, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार न्यायालयीन</u>**

**<u>भाषा मराठीत पुरावा</u>**

**<u>अभियोजन पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०३ ची शपथेवर साक्ष</u>**

मी शपथपुर्वक निवेदन करातो की:

माझे नावः रुपेश कुमार पाटील,

वयः ३५ वर्षे, व्यवसायः नोकरी, सुरक्षारक्षक,

राहणारः तारेघर, ता. रोहा, जि. रायगड.

**<u>सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.ए.एल. पवार यांच्यामार्फत :</u>**

०१. मी सन २०२२-२०२३ मध्ये अंशुल कंपनीमध्ये सुरक्षारक्षक म्हणुन कार्यरत होतो. घटना दि.१५/०६/२०२३ रोजी घडली होती. त्यादिवशी रात्री १०.३० वाजता मी माझे डयुटीवर आलो होतो. मी डयुटीवर आल्यानंतर माझे सुपरवायझर रमाकांत शिंदे यांचेसोबत राऊंडवर रात्री ०१.०० ते ०१.३० चे गेलो होतो. त्यावेळी आम्ही दोघेच राऊंडवर गेलो होतो. आमचे कंपनीचे प्लँटचे मागे ओ.सी. प्लट आहे. तो त्यावेळी बंद होता. त्यातील लाईट देखील बंद होती. त्यावेळी रमाकांत शिंदे यांना काळोखामध्ये दोन २-३ इसम आहेत असे दिसले. आम्ही त्यांना पकडण्याचा प्रयत्न केला. त्याचेपैकी एक मुलगा आम्हाला मिळाला. उर्वरीत दोघे तेथुन पळुन गेले. आम्ही सदर मुलाला पकडुन गेटवर नेले. काळोख असल्यामुळे सदर इसम मोक्यावर काय करत होते, ते आम्हाला दिसले नव्हते. त्यानंतर आम्ही कंपनीचे एचआर मॅनेजर श्री. गिरीश हिरवे यांना फोन करुन घटनेची माहिती दिली. पुढे श्री. रमाकांत शिंदे व श्री. गिरीश हिरवे यांनी पकडलेल्या मुलाला घेवुन पोलीसांकडे घेवुन गेले. सदर मुलाचे नाव रोहीत धोंडगे

होते. मी त्याला ओळखतो. तो आज न्यायालयात हजर असुन आरोपीचे पिंज–यात बसलेला आहे.

०२. घडलेल्या घटनेचे अनुषंगाने पोलीसांनी दोन वेळा माझेकडे चौकशी केली होती व माझे बयाण नोंदविले होते.

सरतपास पूर्ण.

**आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री.एम.डी. पाटील यांच्यामार्फत सुरू.**

०३. मी सुरक्षा रक्षक म्हणुन नोकरी करीत असल्याबाबत पोलीसांना पुरावा दिला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, दि.१५/०६/२०२३ रोजी आमचे अंशुल कंपनीचे कोणत्याही मुददेमालाची चोरी झाली नव्हती. पोलीसांनी मला चौकशीकरीता १७ तारखेला बोलाविले होते. त्यानंतर त्यांनी मला बोलाविले नाही. असे घडले होते की, मी पोलीसांना अगोदर ३–४ माणसे होती असे सांगितले होते. असे घडले नाही की, नंतर मी पोलीसांना एकच माणुस होता सांगीतले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी आमचे कंपनीचा कामगार आहे, त्याला कंपनीमधुन कामावरुन कमी करण्याकरीता श्री. हिरवे यांनी त्याचेविरुध्द खोटी फिर्याद दिली, कंपनी व्यवस्थापनाचे सांगण्यावरून मी पोलीसांना माझा जबाब दिला होता.

०४. हे म्हणणे खरे नाही की, घटनेचेवेळी आरोपी आम्हाला मोक्यावर मिळाला नव्हता, आम्ही त्याला ताब्यात घेवुन कंपनीचे गेटवर आणले नव्हते, नंतर त्याला श्री. शिंदे व श्री. हिरवे यांनी त्यांचेसोबत पोलीस स्टेशनला नेले नव्हते, कंपनी व्यवस्थापनेचे सांगण्यावरुन मी आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

शासन वि. रोहित

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

SUNIL SAKHARAM MAHALE

Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE
Date: 2025.01.29 18:00:33 +0530

स्थळ : रोहा.

(एस. एस. महाले)

दि. २९.०१.२०२५.

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.